# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यात वारकरी विद्यापीठ निर्मितीच्या प्रस्तावाबाबत

**(१) २६५ (१८-०३-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वारकरी विद्यापीठ निर्मितीचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१२-०१-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. तथापि, याबाबत अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माहिम (मुंबई) येथील श्रीगणसिध्दविनायक इमारतीच्या १-ए विंगला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याबाबत

**(२) १७२६ (१८-०३-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहिम (मुंबई) येथील श्रीगणसिध्दविनायक या इमारतीच्या १-ए या विंगला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात यावा असे आदेश मा.नगर विकास राज्यमंत्री यांनी दिले असतानाही या इमारतीस पिण्याचे पाणी देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिण्याच्या पाण्यापासून अनधिकृत वस्त्या व इमारती यांना वंचित ठेवण्यात येवू नये असे मा.उच्च न्यायालयाचे आदेश व शासनाचे धोरण असतानाही या इमारतीस पाणीपुरवठा करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त इमारतीस पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) श्रीगणसिध्दविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या १-ए या इमारतीस मानवतावादी तत्वावर जलजोडणी देण्याकरीता दिनांक २०/०२/२०१४ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत परवानगी प्रपत्र देण्यात आले होते.

तथापि, सदर इमारतीमधील प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव असलेल्या सदनिका महानगरपालिकेस हस्तांतरीत न करता विकासकाने परस्पर विकल्याचे निदर्शनास येताच दिनांक १७/०६/२०१७ रोजी महानगरपालिकेमार्फत सदर परवानगी प्रपत्र रद्द करण्यात आले आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेमार्फत सदर इमारतीमधील रहिवाशांच्या निष्कासनाची कारवाई सुरु असल्याने सदर इमारतीस जलजोडणी देण्यात आलेली नाही.

सदर इमारतीमधील प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव असलेल्या सदनिका बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करावयाच्या अनुषंगाने कायदेशीर कार्यवाही सुरु असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

## दहिसर, मुंबई येथे महानगरपालिकेचे प्रसुतीगृह सुरु करण्याबाबत

**(३) २०६३ (१८-०३-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर, मुंबई येथे महानगरपालिकेचे प्रसुतीगृह नसल्याने गरोदर महिलांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून बोरिवली येथे महानगरपालिकेची तीन प्रसुतीगृहे कार्यरत असली तरी त्याचा लाभ दहिसरमधील महिलांना होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त ठिकाणी महानगरपालिकेचे प्रसुतीगृह सुरु करण्याबाबत ठोस धोरणात्मक निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर/उत्तर विभागातील हरीशंकर जोशी रोड, यशवंतराव तावडे मार्ग दवाखान्याला लागून स्थित असलेल्या जागेत ढवळे ट्रस्ट यांचेमार्फत पीपीपी अंतर्गत दिनांक ३१/१२/२०१९ पर्यंत प्रसुतीगृह चालविण्यात येत होते व सदर प्रसुतीगृहामार्फत गरोदर महिलांना प्रसुतीविषयक सुविधा पुरविण्यात येत होत्या.

तथापि, बोरीवली येथील भंसाळी प्रसुतीगृहाचे दुरुस्तीचे काम सुरु असल्याने सदर प्रसुतीगृह जानेवारी, २०२० पासून ढवळे ट्रस्ट यांचेमार्फत पीपीपी अंतर्गत सुरु असलेल्या प्रसुतीगृह येथे स्थलांतरीत करण्यात आले असून, सदर भंसाळी प्रसुतीगृहामार्फत गरोदर महिलांना प्रसुतीविषयक सुविधा पुरविण्यात येत आहेत.

(२) व (३) रावळ पाडा, दहिसर (पूर्व) येथील नवीन इमारत प्रसुतीगृहासाठी राखीव असून, सदर ठिकाणी लवकरात लवकर प्रसुतीगृह सुरु करण्याबाबत कार्यवाही सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## खुलदाबाद (जि.औरंगाबाद) तालुक्यात ट्रामा केअर सेंटर मंजूर करणेबाबत

**(४) २८७० (२९-०५-२०२०) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुलदाबाद (जि.औरंगाबाद) तालुक्यात धार्मिक व पर्यटन स्थळे असल्याने वाहनाची रहदारी मोठया प्रमाणात असून तेथे सन २०१६-२०१७ मध्ये २१६, सन २०१७-२०१८ मध्ये १६२ तर सन २०१८-२०१९ मध्ये २७८ अपघात झाले असून त्यांना उपचारासाठी औरंगाबाद येथील रुग्णालयात न्यावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खुलदाबाद येथे ट्रामा केअर सेंटर मंजूर व्हावे यासाठी मागील ५ वर्षापासून शासनाकडे पाठपुरावा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खुलदाबाद येथे ट्रामा केअर सेंटर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (११-०१-२०२१) :** (१) अपघातग्रस्त रुग्णांवर खुलताबाद येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येतात. रुग्ण गंभीर जखमी असल्यास रुग्णास औरंगाबाद येथे संदर्भित करण्यात येते.

(२) हे खरे आहे.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १८/०९/२०२० च्या शासन निर्णयानुसार नवीन ट्रॉमा केअर युनिट स्थापन करण्याबाबत आणि उपलब्ध ट्रॉमा केअर युनिटबाबत धोरणात्मक निर्णयानुसार नवीन ट्रॉमा केअर युनिट स्थापन करण्यासंदर्भात प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(५) २८८८ (२९-०५-२०२०) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, श्री.कपिल पाटील, श्री.जयंत प्रभाकर पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील माहे जून, २०२० अखेर आरोग्य अधिकारी, डॉक्टर, परिचारीका, वॉर्डबॉय यांची एकूण मंजूर पदे किती आहेत व त्यापैकी किती पदे रिक्त आहेत,

(२) असल्यास, जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा सामान्य रूग्णालय, ग्रामीण आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अनेक तज्ञ वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे अनेक वर्षापासून भरण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सर्व शासकीय रूग्णालयातील सर्व रिक्त पदे भरण्याबाबत तसेच, भविष्यात कोरोनासारख्या उद्भवणाऱ्या आपत्तींना तोंड देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे आणि त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (११-०१-२०२१) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील रुग्णालयामध्ये विशेषज्ञ संवर्गाची (एस-२३) ची एकूण १७०० पदे मंजूर असून त्यापैकी ११६१ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२०) ची ७९८४ पदे मंजूर असून त्यापैकी ११८१ पदे रिक्त आहेत. परिचारीका संवर्गाची ३०००७ पदे मंजूर असून त्यापैकी ८८६६ पदे रिक्त आहेत. कक्षसेवकांची ३८३० पदे मंजूर असून त्यापैकी ७९० पदे रिक्त आहेत.

(३) वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२३) संवर्गातील पदांची जाहिरात देण्यात आली असून पदे भरण्याची कार्यवाही प्राधान्याने सुरु आहे. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (एस-२३) मधील जिल्हा शल्यचिकित्सक

संवर्ग/जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्ग/विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने व सरळसेवेने भरण्याची कार्यवाही आयुक्तालय व शासनस्तरावर सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ ची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत शासन निर्णय, दिनांक ०२/०३/२०१५, दिनांक २१/०४/२०१५ व दिनांक ०३/१२/२०१८ नुसार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीस अधिकार देण्यात आलेले आहेत. तसेच शासन निर्णय, दिनांक ०४/०७/२०१९ अन्वये वैद्यकीय अधिकारी गट-अ या पदावर एमबीबीएस अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यंत बी.ए.एम.एस. अर्हताधारक उमेदवारांना कंत्राटी पध्दतीने नेमण्याबाबत मान्यता दिलेली आहे.

तसेच गट-क च्या रिक्त पदांपैकी ५७७८ पदांची जाहिरात देण्यात आली असून पदभरतीची कार्यवाही सुरु आहे व गट-ड च्या रिक्त पदांपैकी २४२५ पदांची पदभरती प्रक्रिया कार्यवाही सुरु आहे. कोरोनासारख्या उद्‌भवणाऱ्या आपत्तींना तोंड देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य यंत्रणा सक्षम असून कोविड-१९ बाधित रुग्णांच्या उपचारासाठी स्वतंत्र शासकीय रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांची निश्चिती करण्यात आली असून रुग्णांना सर्वतोपरी उपचार देण्यात येत आहेत. तसेच उपचारासाठी लागणाऱ्या औषध, पीपीटी किट व इतर बाबी खरेदीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन दिला जातो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धर्मादाय रुग्णालयाचा शासकीय योजनेतून उपचाराला नकार दिल्याबाबत

**(६) २९२४ (०२-०६-२०२०) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची (MJPJY) सुविधा असणाऱ्या रुग्णालयांची संख्या ३७ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील एमजीएम, हेडगेवार व कमलनयन बजाज रुग्णालये MJPJY योजनेत रुग्णावर उपचार करण्यास नकार देत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेत ५२% खर्च करावयाचा असल्याने औषधोपचाराचा खर्च पूर्ण होत नसल्याने रुग्णांना योग्य उपचार मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नॉन कोविड रुग्णांवर कोणत्याच रुग्णालयात उपचार करण्यात येत नसल्याचे माहे मार्च-एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नॉन कोविड रुग्णावर प्राधान्याने महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत उपचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (११-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

सध्या औरंगाबाद जिल्ह्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत एकूण ४३ रुग्णालये अंगीकृत आहेत. त्यापैकी औरंगाबाद शहरात एकूण २७ रुग्णालये योजनेंतर्गत अंगीकृत असून त्यात ३ शासकीय व २४ खाजगी रुग्णालये आहेत.
(२) हे खरे आहे.

हेडगेवार हॉस्पिटलमध्ये उपचारास नकार दिल्याच्या ४ तक्रारींची नोंद करण्यात आली असून सर्व तक्रारींचे निराकरण झाले आहे. एमजीएम हॉस्पिटलमध्ये उपचारास नकार दिल्याच्या १२ तक्रारींची नोंद करण्यात आली असून १० तक्रारींचे निराकरण झाले व २ तक्रारी प्रलंबित आहेत. कमलनयन बजाज रुग्णालयात उपचारास नकार दिल्याच्या २३ तक्रारींची नोंद करण्यात आली असून २० तक्रारींचे निराकरण झाले आहे व ३ तक्रारी प्रलंबित आहेत.
(३) योजनेंतर्गत मान्यता प्राप्त सर्व उपचार अंगीकृत रुग्णालयातून मोफत दिले जातात. उपचारात त्रुटी असल्यास १५५३८८ किंवा १८००२३३२२०० या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून तक्रार नोंदविता येते.

(४) हे खरे नाही.

माहे मार्च-एप्रिल, २०२० मध्ये ४७०७ नॉन कोविड रुग्णांवर २५ रुग्णालयांनी उपचार केले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खर्डी-मोडकसागर (ता.शहापूर, जि.ठाणे) रस्त्याची तसेच मोडकळीस आलेल्या पुलाची दुरुस्ती करणेबाबत

**(७) ३१४४ (२९-०५-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने सुमारे ५६ वर्षापूर्वी बांधलेला खर्डी-मोडकसागर रस्ता व दोन पूल मृत्यूचा सापळा बनला असून तो वाहतुकीसाठी बंद केला असतानाही हजारो ग्रामस्थ व वाहनचालक सदर धोकादायक पूलावरुन ये-जा करीत असल्याने उक्त पूल कोणत्याही क्षणी कोसळून येत्या पावसाळयात टेंभा, आंबिवली, भोसपाडा, बळवंडी, बेलवडसह वाडा तालुक्याचा संपर्क तुटण्याची शक्यता असल्याने पर्यायी रस्ता तयार करण्याची मागणी ग्रामस्थांनी गत १ वर्षापासून मुंबई महापालिकेकडे सातत्याने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोकादायक झालेल्या पुलांच्या व रस्त्यांच्या पुनर्बांधणीचे काम हाती न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त दोन्हीही कमकुवत व धोकादायक झालेल्या पूलांसह रस्त्यांच्या पुनर्बांधणीचे काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण करण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०१-२०२१) :** (१), (२) व (३) खर्डी-मोडकसागर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा असून, मोडकसागर धरणाकडे जाण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कर्मचारी सदर रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे सदर रस्त्याच्या परिरक्षणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सन २०१९-२०२० मध्ये खर्डी-मोडकसागर रस्त्याचे ५०% पुनर्पृष्ठीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून, उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

खर्डी-मोडकसागर रस्ता व सेवा रस्त्यावर अस्तित्वात असलेल्या पुलांचे आणि मोऱ्यांचे संरचनात्मक सल्लागारांमार्फत परिक्षण करण्यात आले असून, भोसपाडा पूल पुनर्बांधणी व आंबिवली पूल दुरुस्तीच्या निविदेचे काम प्रगतीपथावर आहे.

आंबिवली व भोसपाडा या ठिकाणचे पूल मोडकळीस आले आहेत. तथापि, सदर रस्त्यावर ये-जा करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तात्पुरती पाईप मोरी टाकण्यात आली असून, त्याव्दारे सदर ठिकाणाहून दैनंदिन दळणवळण सुरु आहे.

तसेच आटगाव-तानसा-अघई-मोडकसागर (वैतरणा)-खर्डी रस्त्यावरील जीर्ण/मोडकळीस अवस्थेत असलेल्या मोऱ्या दुरुस्त/पुनर्बांधणी करणेबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सार्वजनिक बांधकाम विभाग, शहापूर यांना दिनांक ०९/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांच्या विविध समस्या सोडविण्याबाबत

**(८) ३१९२ (०३-०६-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.प. ३ (१०)

(१) मुंबई महानगरपालिकेच्या विविध प्रभागांमध्ये कार्यरत असलेल्या सफाई कामगारांना कोरोनाचे संसर्ग होवून त्यांच्या कुटुंबांतील व्यक्तींना देखील कोरोनाची लागण होण्यास सुरुवात झाली असून अनेक कामगारांचा मृत्यू देखील झाल्याची धक्कादायक बाब माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सफाई कामगारांच्या वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणात सार्वजनिक शौचालयाचा वापर होत असल्यामुळे सदर रोगाचा प्रादुर्भाव वाढत आहे तसेच संक्रमित कामगारांना चुकीच्या ठिकाणी कोरंटाईन करण्यात येत असल्यामुळे चौकीवर हजेरीसाठी येणाऱ्या कामगारांनाही संसर्ग होण्याचा धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका व राज्य शासन यांच्यात समन्वयाचा अभाव असल्यामुळे सफाई कामगारांच्या वस्त्यांमध्ये प्रादुर्भाव वाढत असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील सफाई कामगारांचे कोरोना संसर्गामुळे मृत्यू होण्याचे प्रमाण रोखण्यासाठी तसेच त्यांच्या वसाहतीतील प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनस्तरावर कोणत्या उपाययोजना अथवा कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) :** (१) दिनांक ०७/०७/२०२० पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकूण १८९ सफाई कामगारांना कोरोना संसर्ग झाला असून, त्यापैकी २७ सफाई कामगारांचा मृत्यू झाला आहे व १२६ सफाई कामगार उपचाराअंती पूर्ण बरे झाले आहेत.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा विभागाच्या वसाहती व त्याव्यतिरिक्त वसाहतींमध्ये महानगरपालिकेमार्फत निर्जंतुकीकरणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून, महानगरपालिकेच्या सर्व विभागांत अशाप्रकारचे निर्जंतुकीकरण कार्यक्रम नियमितपणे राबविण्यात येत आहेत.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कोरोनाबाधित व्यक्तीस त्याच्या राहत्या ठिकाणच्या रुग्णालयात गरजेनुसार दाखल करण्यात केले गेले असून, रुग्णाच्या संपर्कात आलेल्या इतर कामगारांची वैद्यकीय चाचणी करुन आवश्यक असल्यास त्यांना होम क्वारंटाईन करण्यात येते.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका व राज्य शासन यांच्यात उत्कृष्ट समन्वय असून, केंद्र/राज्य शासनाकडून प्राप्त सूचना, मार्गदर्शक तत्वे व बैठकीमधील झालेल्या निर्णयानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येते व वेळोवेळी परिस्थितीचा संयुक्त आढावा घेतला जातो.

(४) व (५) मुंबईतील सफाई कामगारांचे कोरोनामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी व त्यांच्या वसाहतीतील कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या/येत आहेत :-

- सफाई कामगारांच्या वैद्यकीय तपासणीसाठी महानगरपालिकेच्या विभागात विभागीय आरोग्य अधिकारी यांचेमार्फत एकूण ७५ वैद्यकीय शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत.
- जुलै, २०२० ते दिनांक ११/०८/२०२० पर्यंत एकूण २८,०७७ सफाई कामगारांची (मनपा व अशासकीय) अँटीजन चाचणी करण्यात आली असून, सदर चाचणीमध्ये १९ कामगार सिप्टोमॅटिक (Symptomatic) व २२८ कामगार असिप्टोमॅटिक (Asymptomatic) पॉझिटीव्ह आढळले होते.
- तद्नंतर एकूण १५,५४७ सफाई कामगार (मनपा व अशासकीय) यांची रिपीट ॲन्टीजन करण्यात आली असून, सदर चाचणीमध्ये २९ कामगार सिप्टोमॅटिक (Symptomatic) व १७७ कामगार असिप्टोमॅटिक (Asymptomatic) पॉझिटीव्ह आढळले होते.
- सदर चाचण्यांमधील बाधित रुग्णांवर उपचार सुरु करुन पुढील कार्यवाही करण्यात आली आहे.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व कामगार वसाहतींमध्ये विशेषत: सफाई कामगारांच्या वसाहतीमध्ये नियमितपणे सॅनिटायझेशन/ निर्जंतुकीकरण करण्यात येते.
- कर्तव्यावर असताना मृत्यू पावलेल्या सफाई कामगारांच्या वारसांना रुपये १ लाख इतक्या रकमेचा तातडीचा विमा व वारसाहक्काने नोकरी अनुज्ञेय आहे. तसेच, कोविड-१९ शी निगडीत कर्तव्य बजावतांना मृत्यू पावलेल्या महानगरपालिकेच्या कामगार/कर्मचाऱ्यांना रुपये ५० लाख इतक्या रकमेचे सानुग्रह सहाय्य लागू करण्यात आले असून, त्याबाबत विभागीय पातळीवर कार्यवाही सुरु आहे.

---

## मालाड, मुंबई येथे महानगरपालिकेमार्फत गरजूंना निकृष्ट दर्जाचे जेवण पुरविण्यात आल्याबाबत

**(९) ३१९६ (०३-०६-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने स्थानिक नगरसेवकाच्या माध्यमातून गरजूंसाठी दुपारी व संध्याकाळी शिजलेले अन्न (जेवण) वाटण्याचे घोषित केले असून सदर जेवण बनवायचे कंत्राट महानगरपालिकेने दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाटप करण्यात येणारे जेवण अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याप्रकरणी कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मालाड येथील महापालिकेच्या पी उत्तर विभागातील स्थानिकांकडून करण्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंत्राटदार महापालिकेकडून संपूर्ण रक्कम घेऊन सुध्दा नागरिकांना निकृष्ट दर्जाचे जेवण देवून गैरव्यवहार करीत असल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/उत्तर विभागात स्थानिकांकडून निकृष्ट दर्जाचे जेवण मिळत असल्याची लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, अशा आशयाची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती.

(३) दिनांक १९/०४/२०२० रोजी स्थानिक नगरसेविका व दिनांक २०/०४/२०२० रोजी पी/उत्तर विभाग प्रभाग समिती अध्यक्ष यांनी कंत्राटदार फोर्स वन किचन यांच्याकडून येणारे जेवण उन्हामुळे खराब झाले असून, जेवणातून वास येत आहे व असे जेवण विभागात पाठवू नये असे समाज विकास अधिकारी (पी/उत्तर) यांना सांगितले.

त्यानुसार कंत्राटदार फोर्स वन किचन यांच्याकडून पी/उत्तर विभागात येणारे जेवण दिनांक २१/०४/२०२० पासून बंद करण्यात आले आहे. तसेच सदर कंत्राटदाराची २५% अधिदानाची रक्कम रोखून ठेवण्यात आली आहे.

सदर कंत्राटदाराऐवजी साई पॅलेस हॉटेल यांचेमार्फत तात्पुरत्या स्वरुपात पी/उत्तर विभागात जेवण्याची व्यवस्था करण्यात आली.

तद्नंतर मालाड (पूर्व) विभागातील स्थानिक नगरसेवकांच्या सूचनेनुसार दिनांक २२/०४/२०२० पासून कंत्राटदार हॉटेल लिंक व्ह्यू व दिनांक २४/०४/२०२० पासून क्वीक डायल कंत्राटदारामार्फत पी/उत्तर विभागात जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच चांगल्या प्रतीचे जेवण देण्याची सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत संबंधित कंत्राटदारांना देण्यात आली आहे.

त्यानंतर याबाबत आजपर्यंत कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बाळापूर (जि.अकोला) तालुक्यात रमाई, शबरी व पारधी आवास योजनांमधून मंजूर केलेल्या घरकुलांबाबत

**(१०) ३४४४ (२९-०५-२०२०) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापूर (जि.अकोला) तालुक्यात गत तीन वर्षापासून रमाई आवास, शबरी व पारधी आवास इत्यादी योजनांमधून मंजूर केलेल्या घरकुलांपैकी ६० टक्केच घरकुलांची कामे पूर्ण झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यात घरकुलांची कामे पूर्ण होण्याची टक्केवारी सर्वात कमी ४३.६० टक्केच असून अकोला जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या बदलीनंतर घरकुलाच्या कामात शिथिलता आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार बाळापूर (जि.अकोला) तालुक्यात घरकुलांची कामे पूर्ण होऊन सर्वांना घरे मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१८-०१-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

रमाई, शबरी व पारधी आवास योजनेंतर्गत मागील तीन वर्षाची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे.

**रमाई आवास योजना -**

| वर्ष | उद्दीष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | पूर्ण झालेल्या घरांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २०१६-२०१७ | २२५ | २२५ | २०७ | ९२ |
| २०१७-२०१८ | ३७४ | ३७४ | २५८ | ६९ |
| २०१८-२०१९ | ५४८ | ५४८ | ४८ | ९ |
| एकूण | ११४७ | ११४७ | ५१३ | ४५ |

**पारधी आवास योजना -**

| वर्ष | उद्दीष्ट | साध्य | पूर्ण झालेल्या घरांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०१६-२०१७ | ३९ | ३५ | ९० |
| २०१७-२०१८ | १० | ५ | ५० |
| २०१८-२०१९ | १० | ० | ०० |
| एकूण | ५९ | ४० | ६७ |

**शबरी आवास योजना -**

| वर्ष | उद्दीष्ट | साध्य | पूर्ण झालेल्या घरांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०१६-२०१७ | १२ | १० | ८६ |
| २०१७-२०१८ | ०५ | ०५ | १०० |
| २०१८-२०१९ | १० | ०० | ०० |
| एकूण | २७ | १५ | ५५ |

(२) राज्यात कोविड-१९ या संसर्गजन्य आजारामुळे या योजनेकरीता पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध झालेला नाही त्यामुळे पूर्ण घरकुलांची टक्केवारी कमी झाल्याचे दिसून येते. सदरहू परिस्थिती पूर्ववत झाल्यानंतर बांधकामाच्या प्रगतीकडे लक्ष देऊन बांधकामे पूर्ण करण्यात येतील.

(३) सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात रुपये ५००.०० कोटी (अक्षरी रूपये पाचशे कोटी फक्त) इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला असून कोविड-१९ ची उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेता, या लेखाशिर्षाखाली रुपये १५०.०० कोटी (अक्षरी रूपये दीडशे कोटी फक्त) इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

तसेच, सदर योजनेसाठी मागणी विचारात घेऊन तातडीची बाब म्हणून डिसेंबर, २०२० च्या हिवाळी अधिवेशनात या योजनेकरीता रुपये ५००.०० कोटी (अक्षरी रूपये पाचशे कोटी फक्त) इतका निधी पुरक मागणीव्दारे उपलब्ध करून देण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी रुग्णालयाला कृत्रिम सांधा रोपणाच्या शस्त्रक्रियेस परवानगी देण्याबाबत

**(११) ३४४९ (२९-०५-२०२०) डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १८९० ला दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत आजपर्यंत एकूण ४९२ (८२ शासकीय व ४१० खाजगी) अंगीकृत असून नवीन ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले असून लेखापरिक्षण प्रक्रिया सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुकास्तरावर आजतागायत किती रुग्णालये नोंदणी कृत झाले आहेत,

(३) असल्यास, सुधारीत एकत्रित प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांसह महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांना सांधे प्रत्यारोपणाच्या उपचारांचा लाभ देण्यात येणार आहे, याबाबत योजनेच्या निविदा प्रक्रिया पूर्ण करुन प्रशासकीय बाबी पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (११-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

३१ मार्च अखेरीस योजनेमध्ये ४९२ रुग्णालये अंगीकृत होती.

दिनांक १ एप्रिल पासून राबविण्यात येणाऱ्या सुधारित एकत्रित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये दिनांक २५/११/२०२० रोजी एकूण ९६८ (२९७ शासकीय व ६७१ खाजगी) अंगीकृत रुग्णालये आहेत. दिनांक १ एप्रिल, २०२० पासून आजपर्यंत २१६ नवीन ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले असून अर्जाची छाननी करून व जिल्ह्यातील रुग्णालयांच्या आवश्यकतेनुसार अंगीकरण करण्यात येईल.
(२) ३५८ तालुक्यापैकी २५२ तालुक्यात योजनेंतर्गत ९६८ रुग्णालये अंगीकृत आहेत.
(३) शासनाने सुधारित एकत्रित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी युनायटेड इंडिया इंशुरन्स कंपनी लि. या सार्वजनिक क्षेत्रातल्या विमा कंपनीची निवड ई-निविदा पध्दतीने केली आहे. दिनांक १ एप्रिल, २०२० पासून सुधारित एकत्रित योजना राबविण्यात येत असून महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांना सांधा प्रत्यारोपणाच्या १० उपचारांचा लाभ निवडक अंगीकृत शासकीय रुग्णालयातनू देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्हा रुग्णालयाच्या बेजबाबदार कारभाराबाबत

**(१२) ४४१७ (१७-०७-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढी अंतर्गत एका संस्थेने माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान घेतलेल्या रक्तदान शिबिराची ८०% रक्तकार्ड कोणतेही नोंदी न ठेवता अज्ञातांना दिल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्हा रुग्णालयात अपघात व इतर गंभीर आजारांच्या रुग्णांकडे दुर्लक्ष करुन रुग्णांना उपचाराच्या अपुऱ्या सुविधांची भिती घालून हितसंबंध असलेल्या खाजगी रुग्णालयात उपचारार्थ पाठविण्यात येत असल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ फेब्रुवारी, २०२० रोजी बीड जिल्हा रुग्णालयातून जखमेवर उपचार घेतलेल्या वृध्द महिलेच्या जखमेत ४ दिवसांनी आळ्या आढळून आल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बीड जिल्हा रुग्णालयातील बेजबाबदार कारभार व गैरप्रकार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१२-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

जखमेत अळया झाल्यानंतर रुग्ण उपचारासाठी रुग्णालयात आला असे अहवालावरुन दिसून येते.

(४) संबंधित वैदयकिय अधिकाऱ्यांने योग्य तो उपचार केला आहे. यास्तव पुढील कारवाईबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उद्‌योगांसाठी लागणाऱ्या परवानग्यांची प्रक्रिया सोपी करण्याबाबत

**(१३) ४५६२ (१४-०९-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनामुळे राज्यावर आलेल्या मोठ्या आर्थिक संकटामुळे राज्यातील उद्‌योग धंदे आणि व्यवसाय ठप्प झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनलॉकची हळूहळू सुरुवात होत असताना विविध अडचणीमुळे उद्‌योग धंद्यांना उभे राहण्यास कठीण जात असल्याने उद्‌योग व व्यवसायांसाठीच्या काही जाचक परवानग्या सोप्या केल्यास उद्‌योग करणे सुलभ होवून गुंतवणुकदारांना देखील राज्यातील उद्‌योगांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहन मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा परीस्थितीत उद्‌योगांसाठी लागणाऱ्या परवानग्यांची प्रक्रिया सोपी करण्यासाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (१२-०१-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र शासन, महसूल, वने व आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील आदेश क्र.डीएमयू/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१, दिनांक १७/०४/२०२० अन्वये निर्गमित सूचनांमधील कलम क्र.२१(vi) मध्ये उल्लेख केल्यानुसार लॉकडाऊन कालावधीत उद्‌योगाचे कामकाज सुरु करणेकरीता परवानगी मिळणेसाठी http://permission.midcindia.org/ हे पोर्टल विकसित करण्यात येऊन सदर पोर्टलव्दारे उद्‌योगाचे कामकाज सुरु करण्यात आल्याचे शासनास कळविणेची सुविधा उद्‌योजकांना उपलब्ध करुन देण्यात आली होती.

लॉकडाऊनच्या दुसऱ्या चरणात दिनांक २० एप्रिल, २०२० पासून केंद्र शासनाने दिलेल्या सूचनांनुसार ज्या उद्‌योगात कामगारांची निवास व्यवस्था होवू शकेल तसेच जे उद्‌योग त्यांच्या कामगारांची समर्पित वाहतुकीची व्यवस्था करु शकतील अशा ग्रामीण व शहरी औद्‌योगिक क्षेत्रातील उद्‌योगांना उत्पादन सुरु करण्यास परवानग्या देण्यात आल्या. सदर परवानग्या उद्‌योगांना ऑनलाईन पध्दतीने स्वयंम घोषणापत्राव्दारे महाराष्ट्र

औद्योगिक विकास महामंडळाच्या (MIDC) पोर्टलवरुन देण्यात आल्या. तसेच महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळाच्या दिनांक १/०७/२०२० व दिनांक २२/१०/२०२० च्या परिपत्रकान्वये लॉकडाऊन कालावधीमध्ये भूखंडाचा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी संपलेल्या दिनांकापासून कोणतेही अतिरिक्त प्रिमियम न आकारता दिनांक ३१/१२/२०२० पर्यंत वाढविण्यात आलेला आहे.

त्याचप्रमाणे कोविड-१९ च्या पश्चात उद्योग वाढीसाठी राज्य शासनामार्फत करावयाच्या उपाययोजना तसेच उद्योगांसाठी लागणाऱ्या परवानग्यांची संख्या कमी करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना राबविण्याबाबत दिनांक ०६/०७/२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्या अंतर्गत महा-परवाना, जोडा आणि वापरा (plug and play infrastructure) तसेच राज्यातील स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी एकत्रित समन्वय व सहाय्य मिळण्याकरीता औद्योगिक कामगार ब्युरो पोर्टल (महाजॉब्स पोर्टल) सुरु करण्यात आले आहे. सबब, कोविड-१९ च्या पश्चात राज्यातील उद्योग वाढीसाठी राज्य शासनाकडून विविध परिणामकारक उपाययोजना करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खाजगी रुग्णालयामधील रुग्ण महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेपासून वंचित राहत असल्याबाबत

**(१४) ४९५९ (१७-११-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असताना खाजगी रुग्णालयामधील रुग्ण महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेपासून वंचित राहत असून ही योजना राज्यभर राबविली जाणार असल्याचे जाहीर केले असतानाही योजनेची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्याास, राज्यात कोरोना रुग्णांची संख्या ८० हजारावर गेली असताना शासनाने दारिद्रय रेषेखालील व इतर नागरिकांना खाजगी रुग्णालयामध्ये रुग्ण सेवा मिळण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत नागपूर येथील ४० रुग्णालयांची नोंदणी करण्यात आली असून यामध्ये ९ शासकीय व ३१ खाजगी रुग्णालयांचा समावेश करण्यात आला आहे परंतु यामधील ११ पैकी एकाच रुग्णालयामध्ये ही योजना राबविली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत किती रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत व या योजनेंतर्गत रुग्णांना लाभ न देणाऱ्या रुग्णालयावर कोणती कारवाई करण्यात आली आहे तसेच ही योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२८-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

नागपूर जिल्ह्यात योजनेंतर्गत एकूण ३८ (९ शासकीय व २९ खाजगी) रुग्णालये अंगीकृत आहेत. त्यापैकी कोविड करीता १० (३ शासकीय व ७ खाजगी) रुग्णालये अंगीकृत आहेत.

(३) १ एप्रिल, २०२० ते आजतागायत योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयामार्फत ३६४८८७ उपचार मोफत देण्यात आले आहे.

२ जुलै, २०१२ ते आजगायत ११२९ तक्रारींची नोंदणी केली असून ९१९ तक्रारींचे निवारण झाले आहे. तसेच रुग्णालयांना नोटीस पाठविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## राज्यात मिनी चित्रपटगृह उभारण्याबाबत

**(१५) ५००० (१४-१२-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठी चित्रपट अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचविण्यासाठी “मिनी चित्रपटगृह” (मिनी मल्टीप्लेक्स) उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावावर अद्यापपर्यंत निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१८-०१-२०२१) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आशा वर्कर्स व गटप्रवर्तक यांचे मानधनात वाढ करुन त्यांना आरोग्य सुविधा पुरविण्याबाबत

**(१६) ५०७८ (१३-०१-२०२१) श्री.कपिल पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ७० हजार आशा वर्कर्स व गटप्रवर्तक यांनी आरोग्य सुविधा आणि उपजिविकेच्या मागण्यांकरीता आंदोलन करण्याचा इशारा दिल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात स्वतःचा जीव धोक्यात घालून आरोग्य सेवा पुरविणाऱ्या आशा वर्कर्सना आरोग्य सुविधा व वेतनापासून वंचित ठेवण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील आशा वर्कर्स यांचे मानधन रुपये १८ हजार करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आशा वर्कर्स व गटप्रवर्तक यांचे मानधनात वाढ करुन त्यांना आरोग्य सुविधा व इतर मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१४-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) आशा स्वयंसेविकांना आरोग्य सुविधा व वेतनापासून वंचित ठेवण्यात आलेले नाही.
(३) अंशत: खरे आहे.

विविध संघटनांनी आशांचे मानधन रुपये १०,०००/- ते रुपये १५,०००/- करावे अशा प्रकारची निवेदने सादर केली आहेत.

(४) १. आशा स्वयंसेविकेस केंद्र शासनाकडून माहिती/अहवालाचे अचूक संकलन व बैठकांकरीता दरमहा रुपये २०००/- व आयुष्यमान भारत कार्यक्रमांतर्गत दरमहा रुपये १०००/- इतका मोबदला अदा करण्यात येत आहे.

२. कोविड कामासाठी आशा स्वयंसेविकांना दरमहा रुपये १०००/- व गट प्रवर्तकांना रुपये ५००/- तसेच केंद्र शासनाने निर्धारीत केल्याप्रमाणे नेमुन दिलेल्या ७८ कामांपैकी नियमित चार कामासाठी दिनांक १७ जुलै, २०२० च्या शासन निर्णयानुसार राज्य शासनाच्या निधीतून आशा स्वयंसेविकांना दरमहा रुपये २०००/- व गट प्रवर्तकांना दरमहा रुपये ३०००/- इतका अधिकचा मोबदला अदा करण्यात येत आहे.

३. उर्वरित कामाच्या बाबींवर आशा स्वयंसेविका ज्या प्रमाणात सेवा देतील त्या प्रमाणात त्यांना मोबदला प्राप्त होतो.

४. प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तकांना रुपये ५० लाखापर्यंत सुरक्षा कवच देण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## राज्यातील सार्वजनिक आरोग्य, पोलीस, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वॅक्सिन उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७) ५१३१ (१७-११-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळा सुरू करण्यापूर्वी सार्वजनिक आरोग्य विभाग, पोलीस यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना प्राधान्याने वॅक्सिन देण्याबाबतची मागणी शिक्षक भारती संघटनेनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने वॅक्सिन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (११-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) लस निर्मिती हा विषय केंद्र सरकारच्या अधिन असून कोविड-१९ विरोधी लस निर्मितीबाबत सरकार आवश्यक ती पावले उचलत आहे. अद्याप कोविड-१९ विरोधी लस टोचणीसाठी उपलब्ध झालेली नाही. भारतातील ३ लसी फेज ३ मध्ये असून त्या जानेवारी-फेब्रुवारी २०२१ पर्यंत उपलब्ध होतील असे केंद्र सरकारने सांगितले आहे. कोविड-१९ लसीकरणाच्या समन्वयासाठी दिनांक २१/११/२०२० रोजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे. लसीकरणाचा प्राधान्यक्रम ठरविणे देखील या समितीच्या कार्यकक्षेत आहे. याबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विकास विभागाच्या कंत्राटी संगणक शिक्षक व निर्देशक यांना ११ महिन्यांसाठी पुनर्नियुक्ती देण्याबाबत

**(१८) ५१५० (१४-१२-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या सर्व कंत्राटी संगणक शिक्षक व निर्देशक यांना सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षासाठी माहे जून, २०२० पासून ११ महिन्यांसाठी पुनर्नियुक्ती देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी (कोकण पदवीधर मतदार संघ) मा.आदिवासी विकास मंत्री यांना दिनांक १८ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने चौकशी करुन सदरहू कंत्राटी कर्मचाऱ्यांना पुनर्नियुक्ती देण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१२-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) यासंदर्भात आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील एच.एस.सी. (व्होकेशनल) अभ्यासक्रमाच्या रुपांतरणाची प्रक्रिया रद्द करण्याबाबत

**(१९) ५१५३ (१८-११-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्‌योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एच.एस.सी. (व्होकेशनल) व्यवसाय अभ्यासक्रम बंद करुन सदर अभ्यासक्रमांचे रुपांतर इतर विभागात करण्याचा मुख्य उद्देश काय आहे, तसेच सदर अभ्यासक्रमांचे सक्षमीकरण करण्याबाबतचा समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे काय, अभ्यासक्रमांचे रुपांतरण न करता सक्षमीकरण करण्याबाबत निर्णय घेण्यात आला काय,

(२) असल्यास, एच.एस.सी. (व्होकेशनल) अभ्यासक्रमाच्या रुपांतरणाची प्रक्रिया रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री यांना दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (१४-०१-२०२१) :** (१) +२ स्तरावरील खाजगी अनुदानित संस्थामधील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांचे रुपांतर करण्याचा धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने शासनास शिफारस करण्यासाठी गठीत करण्यात आलेला समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) समितीचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वांद्रे (पूर्व), मुंबई येथील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना माफक दरात मालकी हक्काची घरे देण्याबाबत

**(२०) ५१७३ (२०-११-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांद्रे (पूर्व), मुंबई येथे सन १९५९ मध्ये ३७ एकर जागेवर बांधण्यात आलेल्या शासकीय वसाहती मधील हजारो निवासस्थानांची दुरवस्था झाली असून कित्येक इमारती दुरुस्तीपलीकडे गेल्यामुळे सदर शासकीय वसाहतींच्या पुनर्विकासाच्या कामात शासनाकडून जाणीवपूर्वक विलंब होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय वसाहतीत वास्तव्यास असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना शासकीय वसाहत पुनर्विकास योजनेंतर्गत माफक दरात मालकी हक्काची घरे देण्यासंबंधी तत्कालीन शासनाने निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या लोकप्रतिनिधींच्या समितीने आपला अहवाल दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन शासनाला सादर केला असूनही गत अनेक महिन्यापासून सदर प्रकल्पाबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही न केल्याने सदर प्रकल्प प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त वसाहतीचा पुनर्विकास करुन तेथे वास्तव्यास असलेल्या शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना माफक दरात घरे उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१२-०१-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पवई, मुंबई येथील हिरानंदानी भागातील गॅलेरिया मॉल मधील अनधिकृत अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(२१) ५२०० (१३-११-२०२०) श्री.रामनिवास सिंह : तारांकित प्रश्न क्रमांक २४९५ ला दिनांक ११ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवई, मुंबई येथील हिरानंदानी भागातील गॅलेरिया मॉल मधील बेसमेंटमध्ये अनधिकृत अतिक्रमणेविरोधात लोकप्रतिनिधींनी तक्रार केल्यानंतर दिनांक ४ सप्टेंबर, २०२० रोजी महानगरपालिकेव्दारे कारवाई करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेव्दारे कारवाई करतेवेळी संबंधिताना सदर अतिक्रमणे काढून टाकण्यासाठी दोन दिवसांची मुदत देण्यात आली असूनही आजमितीस उक्त अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत महानगरपालिकेकडून दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०१-२०२१) :** (१) गॅलेरिया मॉलमधील येण्या-जाण्याच्या मोकळ्या जागेवर व तळघरातील अतिक्रमणाबाबत लोकप्रतिनिधींनी केलेली तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे.

सदर तक्रारीस अनुसरुन बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०४/०९/२०२० रोजी संयुक्त कारवाई आयोजित करण्यात आली होती.

(२), (३) व (४) सदर कारवाई दरम्यान गॅलेरिया मॉलच्या तळमजल्यावरील मोकळ्या जागेत ठेवलेली तात्पुरत्या स्वरुपाची अतिक्रमणे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत काढून टाकण्यात आली.

तसेच, सदर तळघरातील पार्किंग क्र. ८३ व १-ए ला लोखंडी तारांची जाळी लावून साधनसामग्रीचा/मालाचा साठा ठेवण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपाची संरचना निदर्शनास आली.

सदर संरचना काढून घेण्यास उपस्थित मालक/कब्जेदार यांनी त्यांच्या कामगारांमार्फत लोखंडी तारांची जाळी काढण्यास सुरुवात केली असता, कामाचा दिवस संपल्याने सदर लोखंडी तारांची जाळी पूर्णपणे काढणे शक्य झाले नाही. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मालक/कब्जेदार यांना लोखंडी तारांच्या जाळ्या काढून टाकण्याची समज देण्यात आली.

तथापि, दिनांक २२/११/२०२० रोजीच्या स्थळ पाहणीत सदर लोखंडी तारांच्या जाळ्या काढून टाकल्याचे निदर्शनास आले.

तसेच, पार्किंगच्या मालकीबाबत कागदपत्रांची मागणी केली असता, केवळ पार्किंग क्र. ८३ च्या पार्किंगची छायांकित प्रत देण्यात आली. सदर पार्किंगच्या मालकाने पार्किंग क्र. ८३ येथे त्यांची साधनसामग्री/माल ठेवलेला आढळला व पार्किंग क्र. १ए येथे कोणतीही साधनसामग्री/माल ठेवलेले निदर्शनास आले नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## कोरोना रुग्णांच्या उपचारासाठी केंद्राने दिलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(२२) ५२०४ (१७-११-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ.परिणय फुके, अॅड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षासाठी रुपये १५५६ कोटीचा निधी केंद्र शासनाकडून मिळणार असून त्यानुषंगाने कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी केंद्राने माहे एप्रिल ते जून, २०२० या कालावधीसाठी ३९३ कोटी रुपयांचा निधी राज्यास मंजूर केला असून माहे जून, २०२० पर्यंत सदरहू निधी खर्च करणे बंधनकारक असतानाही राज्याने रुपये १८० कोटी विहित मुदतीत खर्च केले असून २१३ कोटींचा निधी अखर्चित राहिल्याने शासनाने जिल्ह्यांकडून निधी परत मागविला असल्याचे दिनांक ८ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाचा दुसऱ्या टप्प्यातील निधी मंजूर झाला असून आधी दिलेल्या निधीतील ७५ टक्के निधीच्या खर्चाची अट राज्याने पूर्ण केली नसून निधी खर्च होत नसतानाही कोल्हापूर जिल्ह्यात सर्वसामान्यांना ५ कोटींची रेमडेसिवीर इंजेक्शन मोफत देण्यापासून ते लाखो नागरिकांच्या संस्थात्मक अलगीकरणासाठीची सोय करणाऱ्या प्रशासनाला मात्र जादा खर्च का केला म्हणून नोटीस बजावण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी शासनाकडून देण्यात आलेल्या निधीचा अपव्यय झाला असून जिल्ह्यात निधीमध्ये करण्यात आलेला गैरव्यवहार व अनियमितत्तेबाबत कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील हाफकिन या संस्थेने काळ्या यादीत टाकलेल्या कंपनीकडून सदोष कीट्सची खरेदी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोरोना बाधितांची संख्या वाढत असून वेळेवर औषधोपचार व व्हेंटीलेटर उपलब्ध न झाल्यामुळे मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले असताना केंद्राकडून प्राप्त झालेला निधी उपचारासाठी खर्च न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच निधीमध्ये गैरव्यवहार व अनियमितता झालेल्या प्रकरणाबाबत शासन विशेष समिती स्थापन करुन त्यांच्यामार्फत चौकशी करणार आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या निधीचा वापर आरोग्य सुविधांसाठी न करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कारवाई करुन राज्यातील कोरोना बाधित रुग्णांना वेळेवर औषधोपचार मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१४-०१-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

प्राप्त निधीपैकी १ नोव्हेंबर, २०२० पर्यंत ३१९.६३ कोटी खर्च झाला आहे. उपलब्ध निधीचा वापर योग्य प्रकारे व्हावा यासाठी कमी खर्च असणाऱ्या जिल्हयांकडील निधी आवश्यकतेनुसार इतर जिल्हयांना फेरवाटप करण्यासाठी मागविण्यात आला होता.

कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी राज्याने ७५ टक्के निधी खर्च केला आहे.

कोल्हापूर जिल्ह्याने मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च केल्यामुळे जास्त खर्चाच्या कारणाची विचारणा करण्यात आली आहे.

(३) मंजूर आराखड्यानुसार सदर निधी खर्च केला असल्याने कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) हे खरे नाही.

(५) कोविड-१९ प्रतिबंध, नियंत्रण व उपचारासाठी केंद्राकडून प्राप्त निधी स्थानिक गरजेनुसार खर्च करण्यात आला आहे. निधीमध्ये गैरव्यवहार व अनियमितता झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी**
**कोरोनाच्या चाचण्या वाढविण्याबाबत**

**(२३) ५२०५ (१७-११-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याची लोकसंख्या ही देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी १०% असताना माहे सप्टेंबर, २०२० अखेर देशाच्या तुलनेत कोरोनाग्रस्त व कोरोनामुळे मृत्यू पावलेल्यांची संख्या जास्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईची लोकसंख्या पाहता माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये केवळ ८.९४% कोरोना चाचणी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईमध्ये कोरोनाच्या रुग्णांची संख्या लक्षात घेता सद्य:स्थितीत मुंबईतील किमान २० ते २५% नागरिकांची कोरोना चाचणी होणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, देशामध्ये माहे ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्याअखेर रेट ऑफ इंफेक्शन कमी झाला असून चाचण्यांची संख्या न वाढवल्यामुळे राज्यामध्ये रेट ऑफ इंफेक्शन व मृत्यूदर वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दररोज सरासरी २० ते २२ हजार नागरिकांची कोरोना चाचणी होणे आवश्यक असताना १० ते ११ हजार नागरिकांची कोरोना चाचणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे याबाबत कोरोना संक्रमण व मृत्यूदर रोखण्यासाठी शासनाने चाचण्यांची संख्या वाढवावी अशी विनंती लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात कोरोना संसर्ग आटोक्यात आणण्यासाठी कोरोना चाचण्या करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (११-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

ऑक्टोबर, २०२० अखेर मुंबईच्या लोकसंख्येच्या ११.४३% व्यक्तींची कोरोना चाचणी झाली होती.

(३) हे खरे नाही.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार दैनंदिन प्रयोगशाळा चाचण्यांचे प्रमाण दर १० लाख लोकसंख्येमागे १४४० असणे अपेक्षित आहे. या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात येत आहे.

(४) ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात पॉझिटिव्हीटी रेट १७.११% एवढा होता. सप्टेंबर, २०२० महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात तो २४.६% एवढा होता. सप्टेंबर महिन्यामध्ये कोरोना मृत्यूदर २.०४% एवढा होता. तो ऑक्टोबर महिन्यामध्ये थोडासा वाढून २.४७% एवढा झाला आहे. तथापि, चाचण्या कमी झाल्यामुळे मृत्यूदर वाढला हे खरे नाही.

(५) हे अंशत: खरे आहे.

राज्यात चाचण्यांची संख्या वाढविण्याबद्दल तसेच मृत्यू दर रोखण्याबाबत अनेक सन्माननीय लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे विनंती केली आहे हे खरे आहे. तथापि, राज्यात सप्टेंबर, २०२० महिन्यात दररोज ८५,३६४ एवढया चाचण्या होत होत्या. तर ऑक्टोबर महिन्यातील हे प्रमाण ७०,३९३ एवढे आहे. दिनांक ३० नोव्हेंबर, २०२० रोजी दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रत्येक जिल्ह्याला आणि महानगरपालिकेला त्यांच्या लोकसंख्येनुसार प्रयोगशाळा चाचण्यांचे उद्दीष्ट निर्धारित करण्यात आले आहे.

(६) कोरोना संसर्ग आटोक्यात आणण्यासाठी प्रभावी प्रयोगशाळा सर्वेक्षण महत्वाचे आहे हे लक्षात घेऊन राज्यात कोरोना निदानासाठी प्रयोगशाळांचे जाळे व्यापक करण्यात आले आहे. आर.टी.पी.सी.आर. तसेच तातडीच्या निदानासाठी ॲन्टीजन चाचण्यांचे प्रमाणही वाढविण्यात आले आहे.

---

## मुंबईत कोरोनाच्या साथीचा प्रादुर्भाव असल्याने रक्त तुटवड्याची परिस्थिती निर्माण झाल्याबाबत

**(२४) ५२२५ (१७-११-२०२०) श्री.महादेव जानकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य रक्त संक्रमण परिषद मान्यता प्राप्त मुंबईतील ५४ रक्तपेढया, महानगरपालिका रुग्णालयांमध्ये केवळ ११९ बाटल्या रक्त शिल्लक असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, रक्ताचा प्रतीयुनिट दर किती आहे हे निर्धारित केलेले असतानाही मुंबईतील ५९ रक्तपेढयांपैकी २० रक्तपेंढयांनी अतिरिक्त दर आकारणी केल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईत कोरोनाच्या साथीचा प्रादुर्भाव असल्याने रक्त तुटवड्याची परिस्थिती निर्माण झाल्याने रुग्णांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रक्तपेढयांमध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण होण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या नियमाचे उल्लंघन करुन अतिरिक्त दर आकारणी करणाऱ्या रक्तपेढयांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (११-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

लॉकडाऊन अंतर्गत निर्बंधामुळे रक्तदान शिबिरे होऊ न शकल्याने संकलन न झाल्याने तसेच स्वेच्छा रक्तदाते वाहतूकव्यवस्थे अभावी येऊ न शकल्याने रक्तसाठ्याचे प्रमाण कमी आहे. परंतु उपलब्ध साठ्यातून रुग्णांना रक्तपुरवठा सुरळीतपणे होत आहे.

(४) कोरोना प्रादुर्भावामुळे रक्तदान शिबीर आयोजित करण्यास आलेल्या मर्यादा तसेच रक्तदाते रक्तदानासाठी पुढे येत नव्हते. त्यामुळे काही प्रमाणात रक्ताचा तुटवडा भासत होता.

(५) जास्त दर आकारणीसाठी दोषी आढळलेल्या संबंधित रक्तपेढयां ना-हरकत प्रमाणपत्र व रक्तपेढीचा परवाना का रद्द करण्यात येऊ नये याबाबत नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या या रक्तपेढयांवर दंडात्मक कारवाई करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्ह्यात बोगस सोयाबीन व बनावट खत विक्री करणाऱ्या केंद्रावर कारवाई करण्याबाबत

**(२५) ५२५० (१८-११-२०२०) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात बोगस सोयाबीन व बनावट खत विक्री केंद्रांवर कृषी विभागामार्फत छापे टाकून कारवाई करण्यात येवूनही अनेक विक्री केंद्रावर सर्रास बनावट खत विक्री सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोगस खत विक्री करणाऱ्या केंद्रावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) यवतमाळ जिल्ह्यात अनधिकृत/बनावट खत विक्री प्रकरणी भरारी पथकाने अचानक तपासणी करुन दोन परवानाधारक कृषी सेवा केंद्रामध्ये अनधिकृत/बोगस डीएपी खताची विक्री सुरु असल्याचे आढळून आल्याने, एकूण १२.७ मे. टन अनधिकृत/बनावट खताचा साठा जप्त करण्यात आला आहे. त्याची अंदाजित किंमत रुपये ३.६० लाख आहे. संबंधित दोषी परवानाधारकाविरुध्द अनुक्रमे दिग्रस पोलीस स्टेशन जिल्हा यवतमाळ येथे गुन्हा क्र. ५६१/२०२० आणि नेर पोलीस स्टेशन जिल्हा यवतमाळ येथे पोलीस गुन्हा क्र. ०२१७/२०२० दाखल करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील परिचारिकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(२६) ५३४३ (१७-११-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील सुमारे ६० परिचारीकांचे काही महिन्याचे वेतन प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने परिचारीकांचे वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१२-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय रायगड-अलिबाग येथील सर्व परिचारीकांचे वेतन व भत्ते विहित कालावधीत अदा करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागांतर्गत येणाऱ्या पूर्णवेळ शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(२७) ५३५२ (१२-११-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागांतर्गत येणाऱ्या राज्यातील २ स्तरावरील एचएससी व्होकेशनला व दिल्ली अभ्यासक्रमाकडील पूर्णवेळ शिक्षक यांच्या प्रलंबित मागण्यासंदर्भात शासनाने गठीत केलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू अहवालाचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (१४-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.
पूर्णवेळ शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत कोणतीही समिती शासनामार्फत गठीत करण्यात आलेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कर्करोगाच्या रुग्णांना सुविधा मिळण्याबाबत

**(२८) ५३७० (१७-११-२०२०) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ५२४ ला दिनांक ३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कर्करोगाच्या रुग्णांना किमोथेरपीची सुविधा देण्यासाठी जिल्हा रुग्णालय येथील फिजिशियन व स्टाफ नर्स यांना सन २०२०-२०२१ पर्यंत प्रशिक्षण देण्याचे नियोजन असून इतर जिल्ह्यामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाच्या उपलब्धतेनुसार किमोथेरपी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (११-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात राज्यातील १६ जिल्हा रुग्णालयांमध्ये किमोथेरपीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून उर्वरीत ७ जिल्हा रुग्णालयांमध्ये ही सुविधा सन २०२०-२०२१ मध्ये उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात कोरोना रुग्णाला उपचार न मिळाल्यामुळे मृत्यू झाल्याबाबत

**(२९) ५४८८ (१७-११-२०२०) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जांब/आंधळगाव (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे बंडू यशवंत मरकाम या कोरोना रुग्णाला भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल न केल्यामुळे सदर रुग्णाचा मृत्यू रुग्णालयाबाहेर झाल्याने याला जबाबदार असणाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी मृताच्या पत्नीने माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णाला उपचार न मिळाल्यामुळे त्यांची ऑक्सिजन पातळी कमी झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१२-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ऑल इंडिया आदिवासी पिपल्स फेडरेशन नागपूर शाखा-तुमसर व गोंडवाना कृति संघर्ष समिती भंडारा यांनी आपल्या निवेदनाव्दारे सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

(२) सदर रुग्णाची “माझे कुटुंब माझी जबाबदारी” या मोहिमेंतर्गत तपासणी केली असता, रुग्णाची ऑक्सिजन पातळी ४० टक्के पेक्षा कमी आढळून आली. सबब सदर रुग्णास प्राथमिक आरोग्य केंद्र, जाम ता.मोहाडी, जि.भंडारा येथे पाठविण्यात आले. येथील वैद्यकिय अधिकाऱ्यांनी रुग्णाची गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन रुग्णवाहिकेने सामान्य रुग्णालय, भंडारा येथे संदर्भित केले. सामान्य रुग्णालय, भंडारा येथे देखील रुग्णाची ऑक्सिजन पातळी ४० टक्केपेक्षा कमी आढळून आल्याने रुग्णाची ॲन्टीजन टेस्ट केली असता ती निगेटिव्ह आली. तथापि, रुग्ण वार्डात परत गेला नाही. त्यानंतर त्याचा मृतदेह दुसऱ्या दिवशी जिल्हा रुग्णालय परीसरात आढळला.

(३) या प्रकरणी जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, भंडारा यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२/१०/२०२० रोजी चार सदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली असता या समितीने या प्रकरणाची सविस्तर चौकशी केली, सर्व संबंधितांचे जबाब नोंदविले आणि पुढील महत्वपूर्ण शिफारशी केल्या.

१) प्राथमिक आरोग्य केंद्र, जाम येथे ऑक्सिजन सिलेंडर्ससाठी आवश्यक फ्लो मीटर उपलब्ध नसणे ही गंभीर बाब असून जिल्हा आरोग्य अधिकारी, भंडारा यांची स्वतंत्र चौकशी करावी.

२) जिल्हा शल्य चिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यातील आंतरविभागीय समन्वय सुधारण्यासाठी आवश्यक पावले उचलावित.

३) रुग्णवाहिकांनी संदर्भित केलेला रुग्ण भरती झाला आहे, याची दक्षता घेऊन संबंधित वैद्यकिय अधिकाऱ्यांची स्वाक्षरी रजिस्टरवर घ्यावी.

सदर रुग्णाचा अंतिम शवविच्छेदन अहवाल प्रलंबित असल्याने सदर चौकशी अहवाल शवविच्छेदन रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर सादर करण्यात येईल. सदर प्रकरणी विलंब झालेला नाही. तथापि, संबंधित रुग्णांचा अंतिम शवविच्छेदन अहवाल प्रलंबित असून तो प्राप्त झाल्यानंतर अंतिम चौकशी अहवाल सादर करुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र व आरोग्य उपकेंद्रांना गावांतर्गत जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३०) ५५१३ (१७-११-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्याच्या वाढत्या लोकसंख्येमुळे आरोग्य सुविधा अपुरी पडत असल्याने शासनाने जिल्ह्यामध्ये लोकसंख्येनुसार नवीन ८ प्राथमिक आरोग्य केंद्र व ४० आरोग्य केंद्रांना मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्र व १६ आरोग्य उपकेंद्रांना गावांतर्गत जागा उपलब्ध होऊ शकली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने प्राथमिक आरोग्य केंद्र व आरोग्य उपकेंद्रांना गावांतर्गत जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (११-०१-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

१७ आरोग्य उपकेंद्रासाठी जागा उपलब्ध झालेली नाही.
(३) मंजूर झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांच्या इमारत बांधकाम करण्यासाठी जिल्हास्तरावरुन संबंधित सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय यांना जागा उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले आहे. ज्या ग्रामपंचायत कार्यालयांनी आजतागायत जागा उपलब्ध करुन दिली नाही, त्यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक समितीच्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाबाबत

**(३१) ५६०९ (२३-११-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ६२१ ला दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक मुंबईत त्यांचे घाटकोपर येथील निवासाचे ठिकाणी उभारण्याचा निर्णय शासनाने यापुर्वीच घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठीचे कामकाज पाहण्याकरीता स्थापन केलेल्या स्मारक समिती गोवंडी येथील अर्जुन सेंटर या खाजगी मालकीच्या इमारतीमध्ये स्मारक समिती कार्यालय दोन वर्षापूर्वी स्थापन करण्यात आले असून या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मिळून १९ जण कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना गेल्या अडीच वर्षाचे वेतन देण्यात आले नसल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित अधिकारी-कर्मचारी यांनी वेतन मिळण्याबाबत शासनाकडे अनेकदा पत्रव्यवहार करुनही त्यांना वेतन अदा न करण्याची कारणे काय आहेत, तसेच त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१४-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासंदर्भात गठीत करण्यात आलेल्या समितीच्या वेतन व इतर अनुषंगिक बाबींच्या अनुषंगाने दिनांक ९/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये

अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे. त्याबाबतचा अहवाल अद्यापपर्यंत शासनास प्राप्त झालेला नाही. सदर अभ्यासगटाच्या अहवालानंतर उपरोक्त समितीवर काम केलेले अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व इतर अनुषंगिक बाबींवर नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत वेगवेगळ्या आजारांचे पॅकेजेस वाढवून देण्याबाबत

**(३२) ५७१७ (१७-११-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सन २०१२ पासून सुरू केलेल्या आधीची राजीव गांधी जीवनदायी योजना व आत्ताची महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना गरीब व गरजू रुग्णांना मोफत उपचार करण्यासाठी सुरू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना सुरू झाल्यापासून इन्शुरन्स कंपन्यांचे पॅकेजेस वाढविण्यात आले असून रुग्णालयाचे पॅकेजेस अद्यापही वाढविले नसून एवढ्या कमी पॅकेजमध्ये उपचार करणे रुग्णालयाला परवडत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत वेगवेगळ्या आजारांचे पॅकेजेस वाढवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१२-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) एकत्रित सुधारित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी पॅकेजेस अंतिम करताना शासकीय व खाजगी रुग्णालयांमधील तज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात आले होते व संचालक, आरोग्य सेवा संचालनालय यांच्या अध्यक्षतेखालील समितीची मान्यता घेण्यात आली आहे. तसेच राष्ट्रीय स्वास्थ्य अभिकरण (National Health Authority) यांनी सदर पॅकेजेससाठी मान्यता दिलेली आहे. योजनेमध्ये अंगीकृत होताना रुग्णालये प्रोसिजर्सच्या दरपत्रकाचे अवलोकन करून व दरपत्रक साक्षांकित करून करारनामा साक्षांकित करतात व योजनेमध्ये अंगीकृत होतात.

(३) एकत्रित सुधारित योजनेमध्ये पॅकेजेस अंतिम करताना आधीच्या योजनेतील ९७१ पॅकेजेसचा अभ्यास करून कमी वापर असणारी व व्दिरुक्ती असणारी ११६ पॅकेजेस वगळण्यात आली आहेत तसेच ११४ पॅकेजेस नव्याने समाविष्ट करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्लास्टिक बंदीसाठी उपाययोजना करण्याबाबत

**(३३) ५७२६ (१२-११-२०२०) श्री.रामदास कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ६४७ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने प्लास्टिक बंदी करण्याचा कायदा केला असून मुंबई व इतर प्रमुख शहरे व ग्रामीण भागांमध्ये सर्वत्र प्लास्टिक पिशव्यांचा वापर केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विभागीय आयुक्त, महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्यासमवेत मा.पर्यावरण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडीओ कॉन्फरनसिंगव्दारा मुंबई येथे दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२० रोजी झालेल्या बैठकीमध्ये अधिसूचनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत देण्यात आलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सर्व महानगरपालिकांना अधिसूचनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृती आराखडा तयार करण्याचे बंधनकारक करण्यात आल्याने महापालिकेमार्फत कृती आराखडा शासनास सादर करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्लास्टिक बंदीवर उपाययोजना करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (२०-०१-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) होय.

अधिसूचनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व २७ महानगरपालिकांनी कृती आराखडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला सादर केले आहेत.
(४) महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशिल वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना २०१८ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींसमवेत दुकानांवर/ आस्थापनांवर केलेल्या संयुक्त कारवाईमध्ये दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत एकूण १७,०७१ दुकान/आस्थापनांकडून एकूण रु ९.७७ कोटी एवढा दंड गोळा केला आहे. या कारवाई दरम्यान जवळपास १२१४ टन इतका बंदी असलेल्या प्लास्टिकचा साठा जप्त करण्यात आला आहे.
(५) सदर कृती आराखड्यांची अंमलबजावणी कोविड-१९ साथीच्या प्रादुर्भावामुळे कमी प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

---

## उजनी धरणातून लातूर जिल्ह्यासाठी पाणीपुरवठा करण्याबाबत

**(३४) ५७६० (२५-११-२०२०) श्री.रमेश कराड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उजनी धरणातून लातूर जिल्ह्यासाठी पाणीपुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्हयासाठी पाणीपुरवठा करण्याबाबत माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान औरंगाबाद येथे "मराठवाडा टंचाई" समितीच्या झालेल्या आढावा बैठकीत तत्कालीन मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी लातूर जिल्हयासाठी पाईपलाईनव्दारे पाणीपुरवठा करण्याची घोषणा केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बैठकीमध्ये पहिल्या टप्प्यात रुपये ३६५ कोटींची निविदा काढण्यात येवून कामास सुरुवात होणार असल्याचे आश्वासन मा.मंत्री महोदयांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लातूर जिल्हयासाठी पाईपलाईनव्दारे पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (११-०१-२०२१) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) सदरील बैठकीत मराठवाडा वॉटरग्रीडबाबत घोषणा करण्यात आली आहे.
(३) होय, हे अंशतः खरे आहे.
मराठवाडा वॉटरग्रीड अंतर्गत लातूर जिल्हयासाठी बंद पाईपलाईनव्दारे पाणीपुरवठा करण्यासाठी तत्वत: रुपये १७२१.९१ कोटी किंमतीच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली होती.
(४) वरील प्रमाणे कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भेंडखळ व पागोटे (ता.उरण, जि.रायगड) भागातील पाणथळ जागेवर भराव सुरु असल्याबाबत

**(३५) ५७९४ (१८-११-२०२०) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भेंडखळ व पागोटे (ता.उरण, जि.रायगड) भागातील ५०० हेक्टर पाणथळ जागेवर भराव सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर भरावामुळे पर्यावरणाचे नुकसान होत असल्याने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (२०-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) सदर बाबतीत उपविभागीय अधिकारी, पनवेल यांचे कार्यालयामार्फत दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजी प्रथम खबरी अहवाल क्रमांक ०२८९/२०१९ उरण पोलीस ठाणे येथे दाखल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंठा (जि.जालना) तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ देण्याबाबत

**(३६) ५८५२ (१३-१२-२०२०) श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंठा (जि.जालना) तालुक्यात सन २०१८ मध्ये शेतकऱ्यांना सोयाबीचा पीक विमा देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंठा लगतच्या परतूर, जिंतूर, लोणार व जालना तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विमा मिळाला, परंतु मंठा तालुक्यातील शेतकऱ्यांना यातून वगळण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मंठा तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१९-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.
योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मंठा तालुक्यात सोयाबीन पिकाचे सरासरी उत्पन्न (९१७ कि.लो/हे.) हे उंबरठा उत्पन्न (६६१ कि.लो/हे.) पेक्षा जास्त आल्याने नुकसान भरपाई देय झाली नाही.

(२) हे खरे नाही.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सोयाबीन पिकाकरीता जालना जिल्ह्यातील जालना तालुक्यातील सेवली हे महसूल मंडळ व बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील सुलतानपुर हे महसूल मंडळ नुकसान भरपाईस पात्र ठरले असून, उर्वरीत जालना जिल्ह्यातील परतूर तालुका व परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यामध्ये सोयाबीन पिकाचे सरासरी उत्पन्न हे उंबरठा उत्पन्न पेक्षा जास्त आल्याने नुकसान भरपाई देय झाली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दिनांक २३ ऑक्टोबर, २०२० च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी स्थगित करण्याच्या मागणीबाबत

**(३७) ५९२६ (१४-१२-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २३ ऑक्टोबर, २०२० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार उपलेखापाल संवर्गातील पदे आदिवासी विभागाकडून न भरता वित्त विभागाकडून भरावीत तसेच सध्या कार्यरत उपलेखापाल यांना समकक्षपदावर समायोजित करावे अशी तरतूद केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू शासन निर्णयामुळे आदिवासी विकास विभागातील चतुर्थश्रेणी कर्मचारी, कनिष्ठ-वरिष्ठ लिपिक या कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळण्यास कायमस्वरूपी विलंब होईल तसेच वित्त विभागातील काही अधिकाऱ्यांनी आदिवासी विकास विभागात १५८ नवी पदे निर्माण करून शासनाच्या खर्चात वाढ केली असून आदिवासी विकास विभागातील ९६ उपलेखापालांची पदे लेखा विभागासाठी वापरण्यात येणार असल्याने आदिवासी विकास विभागाने क्षेत्रिय यंत्रणेला विश्वासात न घेता शासनाची दिशाभूल करणारी माहिती सादर करून चुकीचे ठराव जनजाती सल्लागार परिषदेत केल्याचा आरोप संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, श्री.विक्रम गायकवाड यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २३ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी स्थगित करावी, उपलेखापाल पदाची पदे आदिवासी विकास विभागाकडे ठेवण्यात यावी, आदिवासी विकास विभागातील सर्व उपलेखापालाचे नामकरण मुख्य लिपिक अथवा प्रमुख लिपिक असे करावे, याबाबतचा प्रस्ताव शासनाने विचारार्थ पाठविला नसल्याने राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष पसरलेला असून याप्रकरणी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी गुरूवार दिनांक २९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास राज्यभर सदरहू कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारला त्यामुळे या विभागाचे काम संपूर्णत ठप्प झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मागण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास लवकरच कर्मचारी बेमुदत संपावर जातील, असा गंभीर इशाराही संघटनेने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी विकास विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या सदरहू मागण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (११-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) आदिवासी विकास विभाग कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य, नाशिक चे संस्थापक अध्यक्ष श्री.विक्रम गायकवाड यांनी दिनांक २९/१०/२०२० रोजी अशा आशयाचे निवेदन शासनास दिले आहे.

(५) सदर निवेदनाच्या अनुषंगाने उपरोक्त मागण्यांबाबत कर्मचारी संघटनेसोबत मा.मंत्री, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११/१२/२०२० रोजी बैठक घेण्यात आली असून मागण्यांच्या अनुषंगाने सकारात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ओमशांती गृहनिर्माण सहकारी संस्था, नागपूर या संस्थेच्या मौजा चिचभवन येथील ले-आऊटच्या गैरप्रकाराची चौकशी होण्याबाबत**

**(३८) ५९२९ (२०-११-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओमशांती गृहनिर्माण सहकारी संस्था, नागपूर या संस्थेच्या मौजा चिचभवन येथील ले-आऊटच्या गैरप्रकार व भूखंड धारकांची फसवणूक झाल्याप्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० व दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी निवेदन पाठवून गृह विभागामार्फत चौकशी करुन संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरप्रकार व भूखंड धारकांची फसवणूक करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०७-०१-२०२१) :** (१) होय, अशा स्वरुपाचे निवेदन दिले आहे.

(२) सदर प्रकरणाची पोलीस स्टेशन बेलतरोडी नागपूर शहर यांचेकडून सखोल चौकशी व संबंधित विभागाच्या कागदपत्रांची पडताळणी करुन चौकशी सुरु आहे.

सदर संस्थेविरुध्द या अगोदर सन २०१७ मध्ये तक्रारदार वासुदेव पोहने यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पो.स्टे. सोनेगाव नागपूर शहर येथे अप.क्र.२३०/२०१७ कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यात सचिव, बापुराव चंपतराव कराळे यांना अटक करण्यात आली होती आता ते मरण पावले असल्याने अबेट समरी दिनांक ०२/०२/२०१८ अन्वये प्रकरण निकाली काढले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी गोवारी जमातीस अनुसूचित जमातीचा दर्जा मिळण्याबाबत

**(३९) ५९५२ (१४-१२-२०२०) श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी गोवारी जमातीस अनुसूचित जमातीचा दर्जा मिळण्याबाबत मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर ने दिनांक १४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निर्णयाविरोधात महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयात विशेष रजा याचिका (SLP) दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर गोंड गोवारी ऐवजी गोवारी अशी सुधारणा करण्यासंबंधी केंद्र शासनाने महाराष्ट्र शासनास सुचित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली संबंधित विशेष रजा याचिका मागे घेणार आहे काय, शासनाचे पुढील धोरण काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१३-०१-२०२१) :** (१), (२), (३) व (४) गोवारी समाजास अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याबाबतचे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे दिनांक १४ ऑगस्ट, २०१८ चे आदेश हे मा.सर्वोच्च न्यायालयाने १) मरीचंद्र शेखरराव विरुध्द सेठ जी.एस. मेडिकल कॉलेज (१९९०) ३ SCC १३० महाराष्ट्र शासन विरुध्द मिलींद कटवारे (२००१)१ एससीसी ४, ३) बीरसिंग विरुध्द दिल्ली जल बोर्ड (२०१८) १० एससीसी ३१२ यामध्ये नोंदविलेल्या महत्वपूर्ण निरीक्षणाशी विसंगत असल्यामुळे सदर न्याय निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका दाखल करण्यात आली होती. सदर निर्णयाविरुध्द केंद्र शासनाने देखील मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली होती. सदर याचिकांवर सुनावणी होऊन मा.सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक १८/१२/२०२० च्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे दिनांक १४ ऑगस्ट, २०१८ चे आदेश रद्द केले आहेत. सबब विशेष अनुज्ञा याचिका मागे घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे डिस्कळ गारवाडी (जि.सातारा) या रस्त्याचे काम बंद पाडण्यात आल्याबाबत

**(४०) ६११५ (२०-११-२०२०) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डिस्कळ गारवाडी (जि.सातारा) या रस्त्याचे ग्रामीण मार्ग ११ सा.क्र.१/५०० ते ४/०० या कामास शासनाने सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मंजूरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाची निविदा प्रक्रिया पार पाडण्यात येऊन दिनांक १४ फेब्रुवारी, २०२० रोजी रुपये १७.३८ लक्ष इतक्या रक्कमेच्या कामाचे कंत्राटदारास कंत्राट देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निविदेतील अटीनुसार काम संपत आले असताना कामासाठी कंत्राटदाराने कामाच्या ठिकाणी खडी उपलब्ध करुन रस्त्याच्याकडेला डेपो लावण्याचे कामकरीत असताना काही गावगुंडांनी ठेकेदारास दमदाटी व मारहाण करुन चालू स्थितीतील काम बंद पाडल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बंद पाडण्यात आलेले सदरचे काम तात्काळ सुरु करण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जि.प.सातारा व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा तसेच मा.पालकमंत्री, सातारा जिल्हा यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधिताविरुध्द कारवाई करुन सदरचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१४-०१-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अशी मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(५) मौजे डिस्कळ गारवाडी (जि.सातारा) हा ग्रामीण मार्ग क्र.११ असून त्याची लांबी ४.६०० कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्याच्या सा.क्र.१/५०० ते ४/०० च्या सुधारणा करण्याच्या कामास जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०१९-२०२० मध्ये मान्यता मिळाली असून सदर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार कंत्राटदाराने काम सुरु केले असून खडीकरणासाठी खडी गोळा करण्यात आली आहे. तथापि, कोविड-१९ चा प्रादुर्भाव व पावसाळयामुळे काम बंद होते. तद्नंतर सदरचे काम पुढे सुरु करुन विहित कालावधीमध्ये पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेमार्फत कंत्राटदारास देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे परिमंडळांतर्गत रुग्णालयातील लिपिक संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४१) ६१९५ (२३-११-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक आरोग्य विभागातील मुंबई मंडळ, ठाणे परिमंडळांतर्गत कार्यरत असलेल्या रुग्णालयातील लिपिक संवर्गातील कर्मचारी प्रतिनियुक्तीने इतर आरोग्य संस्थेतील रुग्णालयात गेले असल्याने ठाणे परिमंडळांतर्गत असलेल्या रुग्णालयात अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे कार्यरत लिपिक कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे परिमंडळ रुग्णालयात अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे लिपिक संवर्गातील कर्मचारी अतिरिक्त कामामुळे उच्च रक्तदाब व मधुमेह या आजाराने ग्रासले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे परिमंडळ रुग्णालयातील लिपिक संवर्गात प्रतिनियुक्तीने रिक्त झालेली पदे भरण्याबाबत मागणी करुनही संबंधित अधिकाऱ्यांनी पदे रिक्त ठेवल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने ठाणे परिमंडळांतर्गत रुग्णालयातील लिपिक संवर्गातील रिक्त पदे न भरणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०८-०१-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

आरोग्य संस्थेतील कर्मचारी हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने सदरची रिक्त पदे पदोन्नतीने व पद भरतीने भरेपर्यंत रुग्णालयीन कामाची निकड लक्षात घेता लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना तात्पुरते स्वरुपात उसनवारी तत्वावर सेवा देण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

ठाणे परिमंडळातील रुग्णालयातील रिक्त पदे ही बदलीने तसेच पदोन्नतीने व पदभरतीव्दारे भरण्यात येतात. त्यानुसार पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सरळसेवेची रिक्त पदांबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून त्यानुसार पद भरतीची कार्यवाही सुरू आहे. पदोन्नतीने मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेली पदे न्यायालयीन निर्णयांच्या अधीन राहून रिक्त ठेवण्यात आली आहेत, त्यामुळे सदर पदे भरण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खारेपाटण संभाजीनगर टाकेवाडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) नळ पाणीपुरवठा योजनेच्या प्रलंबित कामाबाबत

**(४२) ६१९८ (१३-१२-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारेपाटण संभाजीनगर टाकेवाडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) नळ पाणीपुरवठा योजनेस सन २०१७-२०१८ मध्ये मंजुरी मिळाली असून सदर

योजनेचे काम पूर्ण करण्याची मुदत दिनांक ३१ ऑगस्ट, २०१९ पर्यंत देण्यात आलेली असतानाही, आजमितीस या योजनेचे काम अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित ठेकेदाराने व अधिकाऱ्याने सदरहू कामात दुर्लक्ष केल्याने सदरहू नळ पाणीपुरवठा योजना दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० पासून बंद ठेवण्याचा इशारा सरपंच, ग्रामपंचायत खारेपाटण यांनी माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना सादर केलेल्या लेखी निवेदनाव्दारे दिला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायत कार्यालयाशेजारी उंच आरसिसी मनोरा बांधून बांधण्यात आलेली साठवण टाकी धोकादायक झाल्याने टाकीवर चढून टाकी साफ करण्यास कर्मचारी घाबरत असून सदरहू टाकी कधीही कोसळण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार नळ पाणीपुरवठा योजनेची प्रलंबित कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू पाणीपुरवठा दिनांक ५ नोव्हेंबर, २०२० पासून पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१३-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) खारेपाटण गावासाठी बांधण्यात आलेली उंच खांबावरील R.C.C. टाकी नादुरुस्त झाल्याने त्या टाकी शेजारीच सन २००९-२०१० मध्ये १.४८ लक्ष लिटर क्षमतेची नवीन टाकी बांधून देण्यात आली असून सदर टाकीव्दारे खारेपाटण गावास पाणीपुरवठा करण्यात येत आहे. जुनी टाकी निर्लेखित करण्याची सूचना ग्रामपंचायतीस देण्यात आली असूनही ग्रामपंचायतीकडून सदर टाकीव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत होता. सदर टाकी निर्लेखित करण्याबाबत ग्रामपंचायतीस पुन्हा सूचना देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रमातून १.२५ लक्ष लिटर क्षमतेची नवीन टाकी बांधण्यात आली असून सदर टाकीत अस्तित्वातील उद्‌भव विहिरीव्दारे उर्ध्ववाहिनी टाकून पाणीपुरवठा करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. उर्ध्ववाहिनीसाठी आवश्यक D.I. Pipes कोविड-१९ मुळे वेळेत उपलब्ध न झाल्याने या कामास विलंब झाला आहे. सदर काम पूर्ण करुन डिसेंबर, २०२० अखेर पर्यंत पाणीपुरवठा सुरु करण्याचे नियोजन आहे.

टाकेवाडीसाठी घेण्यात येणाऱ्या अतिरिक्त उद्‌भवाच्या जागेत बदल होत असल्याने सदरचे काम तूर्त हाती घेण्यात आलेले नाही. तथापि, सद्य:स्थितीत खारेपाटण गावातील जून्या योजनेतून पाणीपुरवठा सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डहाणू (जि.पालघर) परिसरातील खलाश्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(४३) ६२२१ (२०-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर राज्यात ताळेबंदी असल्याने डहाणू (जि.पालघर) परिसरातील खलाश्यांना मासेमारी करता आली नसल्यामुळे हजारो खलाशी व त्यांचे कुटुंबावर उपासमारीचे संकट ओढावले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्व खलाशांच्या मुलांच्या शिक्षणासाठी व उपजिकेसाठी आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०८-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंधेरी, मुंबई येथे कामगार विमा रुग्णालय प्रशासनाकडून नियमांचे उल्लंघन झाल्याबाबत

**(४४) ६२५९ (२३-११-२०२०) डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४७४९७ ला दिनांक २५ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी, मुंबई येथे कामगार विमा रुग्णालयाला सन २०१८ मध्ये लागलेल्या आगीच्या चौकशीसाठी नेमलेल्या समितीच्या चौकशीमध्ये रुग्णालयाने नियमांचे उल्लंघन केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या इमारतीला ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले नसल्याचे तसेच परवानगी न घेता रुग्णालय प्रशासनाने इमारतीच्या बांधकामासाठी वाढीव क्षेत्रफळाचा वापर केला असल्याचे चौकशी समितीच्या अहवालामध्ये नमुद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयाला लागलेल्या आगीत मृत्यू झालेल्या रुग्णांच्या कुटुंबियांना तसेच जखमी झालेल्या रुग्णांना शासनाने कोणती मदत केली आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, कामगार विमा रुग्णालयाला लागलेल्या आगीच्या संदर्भात नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास कधी प्राप्त झाला आहे व त्यानुषंगाने शासनाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (११-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर रुग्णालय हे केंद्र शासनाच्या राज्य कामगार विमा महामंडळाच्या अधिपत्याखालील असल्यामुळे राज्य कामगार विमा महामंडळाकडून मृत व्यक्तींच्या वारसदारास प्रत्येकी रुपये १० लाख, गंभीर जखमींना प्रत्येकी रुपये २ लाख व किरकोळ जखमींना रुपये १ लाख सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले आहे.

(४) आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांनी चौकशी समितीचा अहवाल दिनांक ०५/०९/२०१९ रोजी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागास सादर केलेला आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांना दिनांक ०८/०९/२०२० रोजी कार्यवाही करण्यासाठी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय आरोग्य मिशनच्या निधीमध्ये आर्थिक गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(४५) ६२९४ (२३-०१-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य मिशन (NHM) या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी देण्यात येत असून त्यासाठी आवश्यक असलेल्या उमेदवारांच्या नियुक्त्यांची प्रक्रिया ही राज्य शासनामार्फत राबविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेत उमेदवारांना कायम नियुक्त्या देण्याच्या नावाखाली चारशे कोटीचा आर्थिक गैरव्यवहार होत असल्याबाबत करण्यात आलेल्या देवाणघेवाणीच्या संवादाच्या तीन ऑडियो क्लिपसह मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने राष्ट्रीय आरोग्य मिशनच्या निधीमध्ये आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१४-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे. तथापि, सदर केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतील कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती प्रक्रिया आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचेमार्फत केली जाते.
(२) व (३) हे खरे आहे.

मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना या संदर्भात पत्र पाठविले आहे. सदर प्रकरणी मा.विरोधी पक्षनेते यांचे पत्र प्राप्त होण्यापूर्वीच, सखोल चौकशी करण्याचे निदेश मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे स्तरावरुन देण्यात आले होते.

गडचिरोली जिल्ह्यात आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून पैसे गोळा करण्याची बाब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्या निदर्शनास पोलिसांनी आणून दिली होती. त्यानुसार जिल्हास्तरावर करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीत असे आढळून आले की, सदर रक्कम ही त्यांच्या संघटनेच्या हितास्तव विहित कार्यासाठी कंत्राटी आरोग्य कर्मचारी यांनी जमा केली होती.

तथापि, प्रस्तुत प्रकरणी प्राप्त झालेली तक्रार व ध्वनीफिती विचारात घेऊन या संदर्भात पोलिसांमार्फत सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याने आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्यास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना पोलीस स्टेशन, आरमोरी येथे गुन्हा दाखल करण्यात यावा व पोलिसांना तपासासाठी ध्वनीफित व इतर बाबी उपलब्ध करुन देण्यात याव्यात अशा सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चामोर्शी नगर पंचायत (जि.गडचिरोली) येथे मुख्याधिकारी यांचे पद रिक्त असल्याबाबत

**(४६) ४६८८८ (१२-०७-२०१९) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील नक्षलग्रस्त व आदिवासी बहूल भाग असलेल्या चामोर्शी नगर पंचायतीची (जि.गडचिरोली) सन २०१५ मध्ये निर्मिती होवूनही गत ४ वर्षात

नियमित मुख्याधिकारी मिळाला नसल्यामुळे शहराची विकास कामे प्रभारी मुख्याधिकाऱ्यांमार्फत सुरू असल्याचे दिनांक २८ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील तालुकास्तरावरील संवर्ग विकास अधिकारी, प्रकल्प अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, ग्रामीण रूग्णालयाचे अधीक्षक यासारखी महत्वाची पदे प्रभारी म्हणून सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर प्रभारी पदे नियमित करुन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०१-२०२१) :** (१) चामोर्शी नगरपंचायत येथे दिनांक २४/७/२०१९ रोजीच्या आदेशान्वये नियमित मुख्याधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(२) व (३) तालुकास्तरावरील संवर्ग विकास अधिकारी व प्रकल्प अधिकारी यांची रिक्त पदे ग्रामविकास विभागाकडून व तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी ही रिक्त पदे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून भरण्यात येतात. सार्वजनिक आरोग्य विभागाने चामोर्शी तालुक्यातील तालुका आरोग्य अधिकारी हे पद भरले आहे. वैद्यकीय अधिकाऱ्याचे पद भरण्याबाबत कार्यवाही करण्याचे सार्वजनिक आरोग्य विभागास तसेच संवर्ग विकास अधिकारी व प्रकल्प अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यास ग्रामविकास विभागास कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महापालिकेच्या मिळकतकर आणि बांधकाम शुल्काचा हिस्सा देण्याबाबत

**(४७) ४७३९६ (१२-०७-२०१९) श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्मार्ट सिटी कंपनीने औंध, बाणेर आणि बालेवाडी (जि.पुणे) या परिसरातून मिळणाऱ्या महापालिकेच्या मिळकत कर आणि बांधकाम शुल्काचा अनुक्रमे १० आणि १५ टक्के हिस्सा मागितला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संचालक मंडळाच्या बैठकीत यासंबंधीचा प्रस्ताव ठेवला असल्याने महानगरपालिकेच्या उत्पन्नावर आणि स्वायत्ततेवर परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महानगरपालिकेच्या स्वायत्ततेवर परिणाम होवून महापालिकेच्या तिजोरीवर आर्थिक भार पडू नये याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच केलेल्या निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-१२-२०२०) :** (१), (२), (३) व (४) पुणे स्मार्ट सिटी कंपनीने औंध, बाणेर, बालेवाडी परिसरातून मिळणाऱ्या मिळकत कराच्या १० टक्के व बांधकाम परवानगी शुल्काच्या १५ टक्के हिस्सा पुणे महानगरपालिकेकडे मागणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यास अनुसरून दिनांक ११/०९/२०१८ रोजी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता.

मात्र, पुणे महानगरपालिकेने याबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही, त्यामुळे महानगरपालिकेच्या तिजोरीवर आर्थिक भार पडलेला नाही.

---

## खडकवासला धरण (जि.पुणे) प्रकल्पातून पाणी उचलण्याच्या जागांचे नियंत्रण जलसंपदा विभागाला देण्याबाबत

**(४८) ४७४२८ (१२-०७-२०१९) श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला धरण (जि.पुणे) प्रकल्पातून पाणी उचलण्याच्या जागांचे नियंत्रण पुणे महापालिकेने जलसंपदा विभागाला द्यावेत असे आदेश महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने सुमारे दीड वर्षापूर्वी पुणे महापालिकेला

दिलेले असतानाही महापालिकेकडून पाणी उचलण्याची परवानगी जलसंपदा विभागाला दिलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे महापालिकेकडून मंजूरीपेक्षा जास्त पाणी उचलण्यात येत असल्यामुळे जलसंपदा विभागाकडून माहे जुलैपर्यंत करण्यात आलेले नियोजन विस्कळीत होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे महापालिकेकडून जलसंपदा विभागाला पाणी उचलण्याची परवानगी न देण्याची कारणे काय आहेत व त्यास जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-१२-२०२०) :** (१), (२) व (३) जलसंपदा विभाग, पुणे यांच्याकडून करारानुसार पुणे महानगरपालिकेला ११.५० टी.एम.सी. पाणी देण्यात येते.

तथापि, वाढत्या लोकसंख्येमुळे पुणे महानगरपालिकेस सुमारे १८ टी.एम.सी. पाणी उचलावे लागते. याबाबत पुणे महानगरपालिकेकडून जलसंपदा विभागाकडे वाढीव पाण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

त्यानुसार कालवा सल्लागार समितीच्या झालेल्या बैठकीत पुणे शहरासाठी लागणाऱ्या पाण्याचे नियोजन करण्यात आले असून, त्याप्रमाणे पुणे महानगरपालिका पाण्याचा वापर करत आहे.

पुणे महानगरपालिकेमार्फत आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी वापर होत असल्याबाबत तसेच पुणे शहराला लोकसंख्येच्या मापदंडानुसार पाणीपुरवठा करणेबाबत झालेल्या तक्रारीस अनुसरुन मुख्य अभियंता तथा प्राथमिक विवाद निवारण प्राधिकारी यांच्याकडे सुनावणी झाली होती.

पुणे शहरास दररोज ६४४.२८ एम.एल.डी. एवढा होणारा पाणी वापर सिमित करण्याबाबत तसेच पाणी घेण्याच्या सर्व उद्भवांच्या जागांचे नियंत्रण जलसंपदा विभागाकडे सोपविण्याबाबत दिनांक २३/१०/२०१७ रोजी प्राधिकरणाने पुणे महानगरपालिकेस आदेश दिला होता.

तथापि, या आदेशाविरुध्द महाराष्ट्र राज्य जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे पुणे महानगरपालिकेने दाखल केलेल्या याचिकेत दिनांक १६/११/२०१८ व दिनांक १७/१२/२०१८ रोजी आदेश दिले होते. परंतु या आदेशामध्ये खडकवासला धरण प्रकल्पातून पाणी उचलण्याच्या जागांचे नियंत्रण पुणे महापालिकेने जलसंपदा विभागाला द्यावेत असे आदेश दिले नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

खडकवासला धरणातील पाणी उचलण्यासाठी जलसंपदा विभागाच्या परवानगीने पुणे महानगरपालिकेने स्वखर्चाने ३ जॅकवेल (उपसागृह) बांधले आहेत. सदर उपसागृहे पुणे महानगरपालिकेची असून त्यांची देखभाल, दुरुस्ती व संचलन पूर्णत: पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. त्यामुळे त्याचा ताबा जलसंपदा विभागास देणे अडचणीचे आहे.

तथापि, सदर पंप हाऊस बद्दल पुणे महानगरपालिकेमार्फत जलसंपदा विभागास संपूर्ण माहिती देण्यात येते तसेच सदरची पंप हाऊस/पंपिग मशिनरी जलसंपदा विभागाच्या पाहणीसाठी खुली असतात, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बारामती (जि.पुणे) शहरातून वाहणारी कऱ्हा नदीपात्र प्रदूषित झाल्याबाबत

**(४९) ४७६७० (०३-०२-२०१४) श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारामती (जि.पुणे) शहरातून वाहणारी कऱ्हा नदीपात्र मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर नदी प्रदूषित होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०१-२०२१) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही, असे जिल्हाधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.
(२) व (३) बारामती शहरामधून खंडोबानगर ते बारामती-मळद शिव हद्दीपर्यंतचे क्षेत्रामध्ये कऱ्हा नदीचे पात्र असून त्याची लांबी अंदाजे ६.३० कि.मी. इतकी आहे.

बारामती शहरामधून वाहणाऱ्या कऱ्हा नदीचे प्रदूषण होऊ नये याकरिता बारामती नगरपरिषदेने जुनी हद्द यामध्ये ६५.६३ कि.मी. व वाढीव हद्दीमध्ये ८७.९० कि.मी. अशी एकूण १५३.५३ कि.मी. भुयारी गटार योजना केलेली आहे.

बारामती शहरामध्ये निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणेकरीता गुनवडी रोड, समर्थनगर येथे नगरपरिषदेच्या मालकी हक्काच्या जागेत ११.५० दशलक्ष लिटर क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारलेला आहे.

सदर प्रकल्पामध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करुन शुध्द झालेले पाणी कऱ्हा नदीपात्रात सोडण्यात येते. तसेच नगरपरिषदेच्या मालकीचे मटन मार्केट, फिश मार्केट व कत्तलखान्यातील रक्त मिश्रीत पाण्याची विल्हेवाट लावणेसाठी ई.टी.पी. प्रकल्प बसविण्यात आले आहेत.

त्याचप्रमाणे नगरपरिषद हद्दीतील खंडोबानगर ते मळद गाव हद्दीपर्यंत कऱ्हा नदीपात्राची मशिनरीव्दारे वेळोवेळी स्वच्छता व साफ-सफाई करण्यात येते.

बारामती नगरपरिषद, जलसंधारण विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग या शासनाचे विभागांमार्फत कऱ्हा नदी सुधार प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. त्याकरिता नगर विकास विभाग, शासन निर्णय, दिनांक २२ मे, २०२० अन्वये नगरपरिषदेस वैशिष्ट्यपूर्ण विशेष अनुदान अंतर्गत रुपये १८.६९ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.

तसेच नदीपात्राच्या कडेला विविध प्रकारचे वृक्षारोपण करण्यात आलेले आहे. त्यामुळे कऱ्हा नदीचे सुशोभिकरण वाढले असून प्रदूषण रोखण्यास मदत होत आहे. कऱ्हा नदीपात्राचे बारामती नगरपरिषद हद्दीत प्रदूषण होत नाही, असे जिल्हाधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नविन जलतरण तलाव निर्मितीसाठी असलेले क्रीडा धोरणातील निकष बदलण्याबाबत

**(५०) ४८५०८ (०५-०७-२०१९) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील क्रीडा धोरणामुळे नविन जलतरण तलाव निर्मितीसाठी असंख्य अडचणी येत असल्याने क्रीडा धोरणातील निकष बदलण्यासाठी नंदुरबार जिल्हयातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.क्रीडा मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (०७-०१-२०२१) :** (१) व (२) याबाबतचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.